IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# सजीवांच्या उत्क्रांतीची नवी दिशा : कृष्णात खोत लिखित रिंगाण कादंबरीच्या आधारे

**सौ. पार्वती राजेंद्र नागमोती**
मराठी विभाग, विलिंग्डन महाविद्यालय सांगली (स्वायत्त), महाराष्ट्र, भारत.
parvatinagmoti@gmail.com

**सारांश (Abstract):** *' रिंगाण', या प्रसिद्ध कादंबरीचे लेखक कृष्णात खोत हे समकालीन मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांची ओळख विशेषतः ग्रामीण जीवन, मानवी नातेसंबंध आणि वास्तववादी कथनशैली यासाठी केली जाते. कृष्णात खोत हे अत्यंत संवेदनशील, पर्यावरणवादी, वास्तववादी असे लेखक आहेत. मराठी साहित्यात आज कृष्णात खोत यांचा स्वतंत्र वाचकवर्ग निर्माण झाला आहे. मातीशी निष्ठा राखणाऱ्या लेखकाने वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रदेशनिष्ठ 'कादंबरीकार' म्हणून स्वतःची ठळक ओळख निर्माण केली आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्यासारखा जमिनीशी घट्ट नाळ असलेला आणि कल्पनाशक्तीने आकाशाला भिडणारा हा लेखक ग्रामीण साहित्यविश्वात एक महत्त्वाचे स्थान राखून आहे. भालचंद्र नेमाडे, आनंद यादव, पु.लं. देशपांडे, माडगूळकर अशा अनेक साहित्यिकांच्या साहित्य वाचन प्रेरणेने त्यांचा साहित्यप्रवास सुरू झाला. ग्रामीण मराठी साहित्यात लक्षणीय ठराव्यात अशा कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. 'गावठाण' (२००५), 'रौंदाळा' (२००८), 'झडझिंबाड' (२०१२), 'धूळमाती' (२०१४), 'रिंगाण' (२०१८) या त्यांच्या प्रकाशित कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यांतून लेखकाने ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. याशिवाय 'नांगरल्याविन भुई' (२०१७) हे त्यांनी लिहिलेले ललित व्यक्तिचित्रण प्रकाशित झाले आहे. याशिवाय त्यांनी कथा, कविता, नाटके, समीक्षा इ. साहित्य लेखन केले आहे. लेखकाने कादंबरी, कथा आणि इतर साहित्यप्रकारांत लिखाण करताना विशेषतः ग्रामीण महाराष्ट्रातील ग्रामजीवन, संघर्ष, संस्कृती आणि सामाजिक वास्तव यांचे जिवंत चित्रण त्यांच्या साहित्यात आढळते. गावगाडा, गावसंस्कृती आणि समाजपरिवर्तनामुळे बदलत्या खेड्यातील जीवनसंघर्ष हा त्यांच्या लेखनाचा प्रामुख्याने आशय-विषय आहे. कृष्णात खोत यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रदेशसमूहनिष्ठ कादंबरी लेखनाने 'कादंबरीकार' म्हणून स्वताःची एक ओळख निर्माण केली आहे. डोंगरकपारीतील आदिम जीवन जगणाऱ्या आदिवासी डोंगराळ भागात निकमवाडी येथे त्यांचा जन्म झाला. जमिनीशी नाते असणाऱ्या लेखकांनी स्वतः अनुभवलेले आणि जगलेले जीवन नव्या जाणिवेने व प्रभावीपणे साहित्यात उत्कटपणे मांडले आहे.*

**मुख्य शब्द:** सजीवांच्या उत्क्रांतीची नवी दिशा : कृष्णात खोत लिखित रिंगाण कादंबरीच्या आधारे

## I. प्रस्तावना

' रिंगाण', या प्रसिद्ध कादंबरीचे लेखक कृष्णात खोत हे समकालीन मराठी साहित्यातील एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांची ओळख विशेषतः ग्रामीण जीवन, मानवी नातेसंबंध आणि वास्तववादी कथनशैली यासाठी केली जाते. कृष्णात खोत हे अत्यंत संवेदनशील, पर्यावरणवादी, वास्तववादी असे लेखक आहेत.

मराठी साहित्यात आज कृष्णात खोत यांचा स्वतंत्र वाचकवर्ग निर्माण झाला आहे. मातीशी निष्ठा राखणाऱ्या लेखकाने वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रदेशनिष्ठ 'कादंबरीकार' म्हणून स्वतःची ठळक ओळख निर्माण केली आहे. व्यंकटेश माडगूळकर यांच्यासारखा जमिनीशी घट्ट नाळ असलेला आणि कल्पनाशक्तीने आकाशाला भिडणारा हा लेखक ग्रामीण साहित्यविश्वात एक महत्त्वाचे स्थान राखून आहे. भालचंद्र नेमाडे, आनंद यादव, पु.लं. देशपांडे, माडगूळकर अशा अनेक साहित्यिकांच्या साहित्य वाचन प्रेरणेने त्यांचा साहित्यप्रवास सुरू झाला. ग्रामीण मराठी साहित्यात लक्षणीय ठराव्यात अशा कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. 'गावठाण' (२००५), 'रौंदाळा' (२००८), 'झडझिंबाड' (२०१२), 'धूळमाती' (२०१४), 'रिंगाण' (२०१८) या त्यांच्या प्रकाशित कादंबऱ्या आहेत. या कादंबऱ्यांतून लेखकाने ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण केले आहे. याशिवाय 'नांगरल्याविन भुई' (२०१७) हे त्यांनी लिहिलेले ललित व्यक्तिचित्रण प्रकाशित झाले आहे. याशिवाय त्यांनी कथा, कविता, नाटके, समीक्षा इ. साहित्य लेखन केले आहे. लेखकाने कादंबरी,

ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

कथा आणि इतर साहित्यप्रकारांत लिखाण करताना विशेषतः ग्रामीण महाराष्ट्रातील ग्रामजीवन, संघर्ष, संस्कृती आणि सामाजिक वास्तव यांचे जिवंत चित्रण त्यांच्या साहित्यात आढळते. गावगाडा, गावसंस्कृती आणि समाजपरिवर्तनामुळे बदलत्या खेड्यातील जीवनसंघर्ष हा त्यांच्या लेखनाचा प्रामुख्याने आशय-विषय आहे. कृष्णात खोत यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आणि प्रदेशसमूहनिष्ठ कादंबरी लेखनाने 'कादंबरीकार' म्हणून स्वताःची एक ओळख निर्माण केली आहे. डोंगरकपारीतील आदिम जीवन जगणाऱ्या आदिवासी डोंगराळ भागात निकमवाडी येथे त्यांचा जन्म झाला. जमिनीशी नाते असणाऱ्या लेखकांनी स्वतः अनुभवलेले आणि जगलेले जीवन नव्या जाणिवेने व प्रभावीपणे साहित्यात उत्कटपणे मांडले आहे.

औद्योगिकिकरणामुळे खेड्यांना प्रगतीचे लेबल लावून खेडी उद्ध्वस्त होत आहेत. शेतकरी हा खेड्याचा आत्मा आहे. भवताल उद्ध्वस्त होताना, आजुबाजूच्या रितीरिवाजांमधून अनेक गोष्टी वजा होताना लेखकाची घालमेल लेखनातून अवश्य उमटली जाते. अशा नैसर्गिक बदलांमधून मानवाला त्याचे आदिम स्थान दर्शविणाऱ्या लेखकाने ' रिंगाण ' ही कादंबरी लिहिली. २०२३ सालाचा साहित्य अकादमी पुरस्कार या कादंबरीला मिळाला आहे. मानव आणि निसर्ग तसेच मानव आणि प्राणी यांच्या संबंधाचा एक अनोखा अनुबंध या कादंबरीतून अनुभवयास मिळतो. विस्थापनेच्या घटनेने आदिवासी पाड्यातील गावाला स्थलांतरित व्हावे लागते. शहरी आणि ग्रामीण भागातील समाजाच्या संघर्षातील अनेक पैलू लेखकाने रिंगाण मध्ये उघड केले आहेत, ते पुढीलप्रमाणे अभ्यासू.

## II. विस्थापितांचे जगणे याविषयी लेखक व्यक्त होतात

देवाप्पा हा कादंबरीतील मुख्य नायक आहे. माणूस आणि प्राणी यांचे नाते शेवटपर्यंत जपण्यासाठी संघर्ष करणारा देवाप्पा लक्षात राहण्यासारखा आहे. देवाप्पा मातीला जागणारा, निसर्गावर निस्सिम प्रेम करणारा आहे. देवाप्पाचे एकत्र कुटुंब, ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडवणारे दिसून येते. विस्थापितांचे जगणे जगताना देवाप्पाच्या कुटुंबाला स्थलांतरित समाज, अमानवीय विरोध, विद्रोह, सामाजिक, आर्थिक आणि मानसिक संघर्षांनी भरलेल्या समाजाला सामोरे जावे लागते. त्यामुळे देवाप्पाचे कुटुंब स्थलांतरित होत असताना मुदीवाली म्हैस सहित इतर पाळीव जनावरे नाईलाजाने त्याला जंगलात सोडून द्यावी लागतात.

मनाचे रडणे , आक्रंदन, आजीचे त्या रांजणाला पकडून ठेवणे...या आणि अशा अनेक गोष्टी मनाला पिळवून टाकतात. मूळ अधिवासात माणसाची मनं किती खोलवर रुतलेली असतात, याचं नेमकं चित्रण लेखकाने केले आहे.सगळा गावगाडा स्थलांतरित संकटाने व्याकुळ, हताश झालेला दिसून येतो. एकजुटीने ग्रामस्थ सरकारला विरोध करूनही उगवत्या सत्तेला कोणी थोपवू शकत नव्हते.

"सगळीच त्या दिवशी दिवस उगवला तरी चेहरं आमुश्याच्या रात्रीगत करून डोळं गाळीत बसलेली होतीत. कुणाचाच कोण चेहरा बघायचं धाडस करण्यात तयार नव्हतं. गळ्याला पडून रडण्याशिवाय दुसरं काहीच जमत नव्हतं. साजिवंत सोडाच, दगडाला पण पाझर फुटल्यागत झालेलं होतं. या दगडातनी पिढ्यानं पिढ्या भरलेल्या जिवाची रया गेलेली आढळत होती." ( ' रिंगाण', कृष्णात खोत, पान न. २१)

जन्माला आलेल्या बाळाची जशी नाळ तोडतात तशी मातीशी असलेली नाळ तुटताना होणाऱ्या यातना “रिंगाण” मध्ये मांडल्या आहेत. 'रिंगाण', या कादंबरीमध्ये प्रथमच विस्थापितांच्या दुःखाला वाचा फोडण्यात लेखक यशस्वी झाला आहे. गुंतागुंतीचे आणि भावनिक संबंध गावातील जीवन, संस्कृती आणि लोकजीवनाचं वास्तवदर्शी चित्रण साधी पण प्रभावी, वाचकाला गुंतवून ठेवणारी ही कादंबरी मराठी साहित्यात ग्रामीण वास्तव समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

अनेक प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या लोकांच्या समस्या भावनिकरित्या सखोल व्यापक स्वरूपाच्या आहेत. विश्वास पाटलांची झाडाझडती ' , केशव खटिंग यांचा, ' सालोसाल ', चंद्रकुमार नलगे यांच्या, देवाची साक्ष ' आणि वसंत पाटील यांच्या ' धरणग्रस्तांच्या कविता ' अशा अगदी मोजक्या मराठी साहित्यामधून विस्थापितांच्या मनोज्ञानाचा धांडोळा घेतलेला आढळतो. यावरून असे लक्षात येते की, लेखकाने रिंगणाच्या अनुषंगाने गावगाड्यातील मानवसृष्टी अत्यंत संवेदनशील आणि कळवळ्याच्या हेतूने विस्थापितांच्या दुःखाला वाचा फोडली आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

### III. निसर्ग - मानव संघर्ष

"रिंगाण" मध्ये गावाकडच्या जीवनातील संघर्ष, मानवी स्वभावातील द्वंद्व, आणि परंपरा व आधुनिकतेमधील संघर्ष यांचा सखोल वेध घेतला आहे. 'रिंगाण' म्हणजे एक वर्तुळआहे. ज्यात आयुष्य जगत असलेला माणूस अडकलेला आहे, ही संकल्पना कथेच्या केंद्रस्थानी आहे. ' रिंगाण' मधील निसर्ग – मानव संघर्ष हा अत्यंत वास्तववादी आणि भावनिक स्वरूपाचा आहे. या संघर्षातून मानवाचे आदिम जीवन, त्याच्या अस्तित्वाची झुंज आणि पर्यावरणीय संतुलनाचे प्रश्न प्रभावीपणे उभे राहतात. कादंबरीत निसर्ग एक सजीव शक्ती आहे. देवाप्पाचे कुटुंब आणि निसर्ग यामधील संघर्ष "अस्तित्वासाठीची लढाई" यांमध्ये अडकलेला आढळतो. धरण बांधण्यासाठी मानव निसर्गावर अत्याचार करू पहात आहे. मानव निसर्गाचा अतिरेक करतो. त्यामुळे प्राण्यांचे अधिवास नष्ट होतात. प्राणी गावात येतात. मानवी वस्तींवर हल्ले करतात. त्यामुळे मानवाला धोका निर्माण होतो. अशामुळे निसर्गाचा असमतोल वाढतो. याचा सर्वांवर परिणाम होतो. हा संघर्ष केवळ बाह्य नाही, तर मानवी अंतर्गत संघर्षाचेही प्रतीक आहे. कादंबरी सांगते की, निसर्ग आणि मानव यांच्यातील सहजीवन हेच अंतिम समाधान आहे. लेखक रिंगण कादंबरीत निसर्ग – मानव – प्राणी संघर्ष हा केवळ कथानकाचा भाग नसून तो मानवी अस्तित्व, पर्यावरणीय संतुलन आणि आदिम जीवनाच्या सत्याचा गाभा आहे असे दर्शवतात. हा संघर्ष आपल्याला शिकवतो की निसर्गाशी संघर्ष न करता त्याच्याशी सुसंवाद साधणे आवश्यक आहे असा संदेशही या कादंबरीत दिला आहे.

### IV. डार्विनचा सिद्धांत आणि रिंगाण

रिंगाणचा अभ्यास चार्ल्स डार्विनच्या उत्क्रांती सिद्धांताच्या दृष्टिकोनातून केला असता, तिच्यातील सामाजिक आणि जैविक संघर्ष अधिक स्पष्टपणे समजतो.

"नैसर्गिक निवडीद्वारे उत्क्रांती" (Evolution by Natural Selection) हा डार्विनचा मुख्य सिद्धांत आहे. डार्विन यांनी हा सिद्धांत On the Origin of Species (1859) या पुस्तकात मांडला आहे.

चार्ल्स डार्विन यांनी मांडलेल्या उत्क्रांती सिद्धांतानुसार, सजीवांचा विकास हा "नैसर्गिक निवड" या प्रक्रियेद्वारे होतो. म्हणजेच, जो सजीव परिस्थितीशी जुळवून घेतो तो टिकतो, आणि जो जुळवून घेत नाही तो नष्ट होतो. याचाच अर्थ असा की सजीवांना जगण्यासाठी असलेल्या वातावरणाशी, परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागते, जो सजीव जुळवून घेण्यात यशस्वी होतो, तोच टिकून राहतो. रिंगाण मधील विस्थापितांचा प्रश्न सामाजिक सहकार्य नसल्याने आपापसात सामाजिक संघर्ष निर्माण झालेला दिसून येतो. जगण्यासाठी संघर्ष हा केवळ शक्तिशाली नसावा तर परस्पर सहकार्य करणारा समाज टिकून राहतो. उत्क्रांतीचा सिद्धांत हा केवळ जीवशास्त्रापुरता मर्यादित नसून, रिंगाण सारख्या साहित्यकृतींमध्येही तो मानवी जीवनातील स्पर्धा आणि संघर्षाचे रूपक म्हणून दिसून येतो. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्रत्येक जीव स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी झगडतो.

**"आणि रानबाच्या हातातनं अस्वलाचं पाय सुटलं नि अस्वलानं मानेवर रानबाच्या नख्या रुतवल्या तो रानबाचा आवाज सगळ्या जंगलात घुमला. मानंपासून कपाळापर्यंत रानबाची कातडी सोलून रानबाला बोडका केला. "( ' रिंगाण', कृष्णात खोत, पान न. ७७)**

यावरून असे म्हणता येईल की, 'रिगाण' मधील आदिवासी आणि ग्रामीण पात्रे निसर्गाशी संघर्ष करत जगतात. गावगाड्यातील लोक आणि प्राणी यांचा रोजचा संबंध जीवनाशी निगडीत असतो. रानबा असो किंवा देवाप्पाचा म्हातारा असो, डार्विनच्या सिद्धांतानुसार प्रत्येकजण आपल्या जीवाचे रक्षण करतो. या संघर्षात "योग्य तेच टिकतात" हा डार्विनचा सिद्धांत स्पष्ट दिसतो. फक्त मानवासाठी नव्हे तर जंगलाती प्राण्यांना जंगल, पाणी, अन्न यांसारख्या मूलभूत गरजांसाठी सतत झगडावे लागते. प्राणी, मानव आणि निसर्ग यांच्यातील संघर्ष म्हणजेच एक प्रकारचे "जीवित राहण्यासाठीचे युद्ध" आहे. जंगलातील जीवनात कमजोर व्यक्ती किंवा प्राणी टिकत नाहीत.हेच डार्विनच्या सिद्धांताचे प्रत्यक्ष चित्रण आहे.आदिम जीवनाकडे मार्गस्थ होताना मुदीवाली म्हैस देखील आपले अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करत राहते. तिचे मूळ हिंस्र स्वरूप ती प्रदर्शित करते आणि अस्तित्व जपण्याचा प्रयत्न करते. गावगाड्यामधील ग्रामस्थ जीवन जगताना एकमेकांना सहकार्य करणारा समाज असे चित्रण दिसून येते. कथेतील पात्रं स्वतःच्या परिस्थिती, समाज आणि नियतीच्या "रिंगणात" अडकलेली दिसतात. त्या रिंगणातून बाहेर पडण्याचा त्यांचा संघर्ष हीच कादंबरीची खरी ताकद आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

**मार्क्सवाद आणि 'रिंगण'**

**कार्ल मार्क्स यांच्या मार्क्सवादानुसार**, समाजातील मुख्य संघर्ष हा वर्गसंघर्ष असतो. जागतिकीकरणाच्या रहाटगाडग्यात हरवलेली गावे शोषक आणि शोषित यांच्यातील संघर्षाचे प्रतिनिधित्व करतात.

**मार्क्स यांच्या मते**, "आतापर्यंतच्या सर्व अस्तित्वात असलेल्या समाजांचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे". (कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगेल्स "Manifesto of the Communist Party" (कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा, फेब्रुवारी १८४८). कार्ल मार्क्सचा समाजवादी सिद्धांत हा भांडवलशाहीचा विरोध करून समानतेवर आधारित, वर्गविहीन समाज निर्माण करण्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन समाजाला क्षमताधिष्ठ समाज बनवण्यासाठी प्रेरित करतो.

**सावबा म्हणाला, "अवो पण सरकारला तुमी सांगा. आमास्नी कुठंबी दुसरं गाव देवू दे तिथं जाळतो नेवून मड."**
**"ते सरकारचं तुमी जावई हायसा. उचलाजावा नि इचारा जावा कुठं जाळू मड. नाईतर सरकारच्या दारात जाळा जावा. मला काय त्येचं." तो परत बोलाय लागला.**
**मग त्यांच्यातलाच एकजण, "तिकडं कुठं जाळीत हुता? स्मशानभूमी आमची आशी बाटवू नगा न्या जावा परत नि जाळा जावा तुमच्या घराम्होर तिथंच."**
**"तुमची स्मशानभूमी बाटवाय आमी काय माणसाच्या पोटाला जन्माला आलेलो नाही काय?" सावबाचा पोरगा रागानं पेटू लागला.**
**तशी सगळीच पोरं. "आमी जाळणार इथंच प्रेत" म्हणाली.**
**मगाशी बोलणारा रचलेल्या सरणाचं लाकूड उपसून, "या उचल्यानु तुमास्नी दावतो आमच्या स्मशानात तुमची मडी जाळायची" म्हणून उभा राहिला."**( ' रिंगाण', कृष्णात खोत, पान न. ४५)

यावरून असे दिसून येते की कादंबरीतील जमीन, संसाधने आणि सत्ता यावर काही मोजक्या लोकांचे नियंत्रण दिसते. विस्थापित लोकांचे अंत्यसंस्कारसाठी अडवणूक केली जाते. 'रिंगण' मध्ये स्थलांतरित आदिवासी आणि ग्रामीण लोक शोषित वर्गाचे प्रतिनिधित्व करतात. चांदोली धरण बांधण्यासाठी लोकांना स्थलांतरित करण्यासाठी सबब सांगताना हिंस्त्र श्वापदांचे भय दाखवले जाते. सरकारचा बडगा दाखवून त्यांचे शोषण केले जाते. कादंबरीतील गरीब आणि वंचित लोकांचे विस्थापन, शोषण आणि दडपशाही या गोष्टी लेखकाने अत्यंत प्रभावीपणे मांडले आहेत. या संघर्षातून आर्थिक आणि सामाजिक विषमता स्पष्ट होते. जंगलातील किंवा डोंगरातील लोकांना त्यांच्या जमिनीवरून हटवले जाते. हे भांडवलशाही आणि सत्ताधाऱ्यांच्या शोषणाचे चित्रण आहे.

देवाप्पानं मोराची पिल्ली पाळली होती. इथून जायच्या आधीची गोष्ट. "साहेब यायचे गावकऱ्यांना जागा सोडा म्हणून सांगायचे. सायबांची नजर, मोऱ्याच्या पिल्लावर पडली. मग काय मोर राष्ट्रीय पक्षी आहे असं सांगून त्यानं ती आपल्या गाडीतनं नेली." (पृ. क्र. ३१) या वाक्यांनी कादंबरीत प्रवेश करताना शासन भ्रष्ट असून शोषितांचे कसे शोषण करते हे जाणवते. पण नेलेली मोरांची पिल्ले पाळीव असल्याने पिल्लांनी टोच्या मारुन साहेबांचा डोळा फोडला, इतरांना जखमी केले आणि सरतेशेवटी पिल्ले घरी परत आली. मोराची पिल्ले पदरी न पडल्याने देवाप्पाला साहेबानी धरणाखाली बोलावून घेतले, ते म्हणाले, "मोरांच्या पिल्लांची तक्रार झाली आहे". देवाप्पा घाबरला त्यांच्या विनवण्या करू लागला शेवटी चार-दोन बाटल्या मोहाची दारू नि डबाभर मध देवाप्पाने साहेबांना द्यायचं कबूल करून प्रकरण थांबवले. अशा तऱ्हेने देवाप्पा व देवाप्पाचे कुटुंब आणि विस्थापित गाव यांना सरकारी भ्रष्टाचार गावचे राजकारण यांच्या संघर्षाची झळ पोहचत राहिली.

**"सरकारला आमचीच जमीन दिसली नि ह्यासनी इथं खपीवली". हरभऱ्याचं शेत उलंगलं तेव्हा. आणि आता मनाचं. आहे तसंच कायमचं उठावं नि पळावं असं देवाप्पाच्या घराला वाटाय लागलं ते थांबलं नाही कधीच. पाटील आला. सरपंच आला. आणि रडून आता आमी काय करू सांगा म्हणत सरकार नि त्यांचा उद्धार करत राहिले. हरभरा नि आम्ही फक्त आमचं आमालाच बोलत राहिलो. त्यांचं, "उगच आमी कुणासंग वाईट व्हायचं. सरकारला म्हणीत होतो ज्या गावात गावठाण दिलय तिथंच शेत द्या तर सरकारचं डोस्कं,**

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 | Volume 6, Issue 7, June 2026 | Impact Factor: 8.2

आमच्या डोसक्याला वाळला ताप करून ठेवलाय. तरीबी विचारतो जावा तुमी" म्हणून त्यांना त्यांनी घालिवली."( ' रिंगाण', कृष्णात खोत, पान न. २७)

स्थलांतराच्या वेळेस देवाप्पाच्या शेतात उभे आलेले हरभऱ्याचे पिक चोरांनी चोरून जाते. सरकार या गोष्टीकडे दुर्लक्ष करते. देवाप्पाच्या कुटुंबाला आर्थिक तसेच सामाजिक संकटाशी सामना करावा लागतो. यावरून माणूस केवळ जैविक पातळीवर नाही तर सामाजिक पातळीवरही संघर्ष करतो. 'रिंगाण' मधील पात्रे निसर्गाविरुद्ध आणि समाजाविरुद्ध दोन्ही स्तरांवर लढतात. त्यामुळे ही कादंबरी मानवी अस्तित्वाचा सर्वांगीण संघर्ष दाखवते. 'रिंगाण' कादंबरी ही केवळ आदिम जीवनाचे चित्रण नसून डार्विनच्या सिद्धांताप्रमाणे जीवित राहण्यासाठीचा नैसर्गिक संघर्ष दर्शवते. मार्क्सवादानुसार शोषणाविरुद्धचा सामाजिक संघर्ष उलगडते. 'रिंगाण' ही कादंबरी जंगल, विस्थापित लोक आणि समाज हा संघर्ष, निसर्ग, मानव आणि समाज यांच्यातील त्रिसूत्री संघर्षाचे सशक्त उदाहरण ठरते. 'रिंगाण' कादंबरीचा विषय आणि आदिम जीवनाशी संबंध हा प्रश्न मुख्यतः मानवाच्या मूलभूत प्रवृत्ती, निसर्गाशी असलेले नाते आणि सामाजिक रचनेच्या उगमाशी जोडलेला आहे.

'रिंगाण' या कादंबरीत जीवन म्हणजे एक चक्र आहे, ही कल्पना केंद्रस्थानी आहे. माणूस सतत एका वर्तुळात (रिंगणात) फिरत राहतो. रिंगाण ही कादंबरी समाजातील संघर्ष, स्पर्धा आणि अस्तित्व टिकवण्याची झुंज दाखवते. "रिंगाण" म्हणजेच एक प्रकारचं मैदान,जिथे प्रत्येकाला स्वतःचं स्थान मिळवण्यासाठी लढावं लागतं.

### मानव आणि निसर्ग यांचे नातेसंबंध:-

आजच्या काळात पर्यावरणाचा ऱ्हास, जंगलतोड, हवामान बदल यांसारख्या समस्या तीव्र होत आहेत. रिंगाण कादंबरीत मानव आणि निसर्ग यांच्यातील मूलभूत नाते दाखवले आहे. त्यामुळे आधुनिक समाजाला निसर्गाशी सुसंवाद ठेवण्याची गरज अधोरेखित होते.

### मानव – निसर्ग संबंधाचे पुनर्मूल्यांकन

आजच्या काळात पर्यावरणाचा ऱ्हास, जंगलतोड, हवामान बदल यांसारख्या समस्या तीव्र होत आहेत. रिंगाण कादंबरीत मानव आणि निसर्ग यांच्यातील मूलभूत नाते दाखवले आहे. त्यामुळे आधुनिक समाजाला निसर्गाशी सुसंवाद ठेवण्याची गरज अधोरेखित होते.

### विस्थापन आणि अस्तित्वाचा संघर्ष

आज विकासाच्या नावाखाली अनेक लोक विस्थापित होत आहेत (उदा. धरणे, उद्योग, शहरीकरण). सांगली जिल्ह्यातील चांदोली धरण बांधताना जंगलतोड केल्याने येथील पर्यावरणाचे, प्राण्यांचे तसेच माणसांचे नुकसान झाले आहे. कादंबरीतील पात्रांचे जीवन हे अशाच संघर्षाचे प्रतीक आहे, जे आजही तितकेच वास्तव आहे.

### आदिम जीवन आणि आधुनिकतेचा संघर्ष

आजची आधुनिक जीवनशैली आणि पारंपरिक जीवनपद्धती यांच्यात ताण निर्माण झाला आहे. रिंगाण मध्ये आदिवासी जीवनातील साधेपणा, निसर्गाशी जवळीक आणि आत्मनिर्भरता यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे. रांजणातील पाण्याची चव देवाप्पाचे कुटुंब विसरू शकत नाही.

### सजीवांच्या उत्क्रांतीची नवी दिशा

चार्ल्स डार्विन यांच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताशी तुलना करतात. कादंबरीतील देवाप्पा, त्याची बायको, आज्जी, त्याचे गावकरी यांचा संघर्ष, 'जगण्यासाठी संघर्ष' ही संकल्पना सामाजिक स्तरावर दिसून येते. आजच्या स्पर्धात्मक जगातही ही संकल्पना लागू होते.

### मानवी मूल्यांची जपणूक

आजच्या भौतिकतावादी युगात माणुसकी, सहानुभूती, सामूहिकता यांचा अभाव जाणवतो. सावबा आजीचे अंत्यसंस्कार स्थलांतरित जागेत लोक करू देत नाहीत यावरून कादंबरीत या मूल्यांचे महत्त्व ठळकपणे मांडले आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

**सामाजिक वास्तवाचे प्रतिबिंब**

आजही समाजात गरीबी, अन्याय, विषमता अस्तित्वात आहे. रिंगाण हे वास्तव थेट आणि प्रभावीपणे मांडते, त्यामुळे ती आजच्या वाचकासाठी अधिक सुसंगत ठरते. कादंबरीतील लोकांची जनावरे सोडून येतनना तसेच शेती सोडून येताना ग्रामस्थांचा आर्थिक कणा मोडला जातो. यामुळे त्यांना गरिबीला तोंड द्यावे लागते.

आजच्या अस्थिर वातावरणात "रिंगाण" कादंबरी केवळ साहित्यकृती न राहता, ती एक सामाजिक आणि पर्यावरणीय चेतना जागवणारी कादंबरी बनते. ती आपल्याला सांगते की,विकास करताना निसर्ग, माणुसकी आणि मूलभूत मूल्ये विसरू नयेत.

## V. समारोप

आजच्या युद्धग्रस्त आणि अस्थिर जागतिक परिस्थितीत कृष्णात खोत लिखित "रिंगाण" कादंबरीचा विचार स्थिर समाजव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो. स्थिर समाजासाठी "जिंकणे" नव्हे, तर "एकत्र जगणे" महत्त्वाचे आहे, हा संदेश कादंबरी देते.रिंगाण मध्ये निसर्गाशी संतुलित नाते दाखवले आहे, जे स्थिर समाजव्यवस्थेचा पाया ठरते.कादंबरीतील विस्थापितांचे जीवन आपल्याला सांगते की स्थिर समाजासाठी प्रत्येकाला सुरक्षित आणि सन्मानाचे जीवन मिळणे आवश्यक आहे.रिंगाण मध्ये सामूहिकता, सहकार्य आणि सहवेदना यांचे महत्त्व दिसते, जे समाजाला स्थैर्य देते.

आधुनिक जीवन कितीही बदलले तरी माणसाच्या आतला आदिम स्वभाव अजूनही तसाच आहे. तोच त्याच्या विचारांमध्ये, संघर्षात आणि जीवनशैलीत दिसून येतो. मानवाचे स्थैर्य हे मानवतेच्या अस्तित्वाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. 'जगा आणि जगू द्या ', हा मूलमंत्र मानवतेच्या सहजीवनासाठी गरजेचा आहे.

आदिम जीवनात जन्म - मृत्यू हे चक्र म्हणजे रिंगाण होय. निसर्गाचे हे आदिम रिंगाण कादंबरीत स्पष्ट जाणवते.

'रिंगाण' ही संकल्पना त्याच चक्राचे प्रतीक आहे. मूदीवाली म्हैस रिंगणाच्या केंद्रस्थानी एक प्रतीक आहे. परिवर्तन हा निसर्गाचा नियम असल्याने जीवन सतत फिरत असते.सजीव बदलतात तसं कादंबरीतील पात्रंही परिस्थितीनुसार बदलतात.जे सजीव परिस्थितीशी जुळवून घेतात तेच जगतात आणि पुढे वाढतात. आदिम जीवनाकडे सजीवांचे स्थैर्य अधोरेखित करताना देवाप्पा निसर्गाच्या नियमाला नतमस्तक होतो. जंगलात सोडून दिलेल्या मुदीवाली म्हैशीला जंगलातील जनावरे सहजीवनाचे तत्व सांभाळत आपल्यात सामावून घेतात. तिचे देवाप्पापासून रक्षण करण्यासाठी तिला सुरक्षित रिंगणात केंद्रस्थानी ठेवतात. अशा तऱ्हेने जनावरांनी स्वतःच्या अस्तित्वासाठी आपला मूळ हिंस्र स्वभाव दाखवून दिला. अशा तऱ्हेने सहजीवन आणि संरक्षण ही निसर्गाची एक बाजू आहे, त्याचबरोबर संघर्ष आणि हिंसा ही देखील त्याचाच अविभाज्य भाग आहे. निसर्गातही सहजीवन, परस्पर सहकार्य आणि संरक्षणाची प्रवृत्ती अस्तित्वात आहे हे दाखवताना जंगलात सोडून दिलेली मुदीवाली म्हैस ही समाजातील दुर्बल, विस्थापित किंवा असहाय घटकांचे प्रतीक आहे. तिला जंगलातील इतर प्राण्यांनी आपल्या कळपात सामावून घेतले.

आजच्या अस्थिर मानवजीवनात जगत असलेला काळ हा विस्थापनाचा काळ आहे. अशा परिस्थितीत मानवाला आपले अस्तित्व टिकवून ठेवणे संघर्षात्मक झाले आहे. अस्थिर जीवनात मानव स्थैर्याच्या शोधात आहे त्यामुळे तो आदिम जीवनमूल्यांकडे वळताना दिसतो. निसर्गाशी सुसंवाद, साधेपणा आणि सहजीवन यांच्यातच खरे समाधान दडलेले आहे, हे 'रिंगाण' अधोरेखित करते. त्यामुळे आधुनिकतेच्या गर्दीतही मानव आपल्या आदिम जीवनप्रवाहाकडे परतण्याचा प्रयत्न करत आहे. आपली भाषा, आपली संस्कृती, आपले मूळ शोधण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. विदीर्ण प्रदेशातील पाळीव जनावरे, रानटी होऊन आदिम अवस्थेकडे मार्गक्रमीत होतात, हाच उत्क्रांतीवदाचा नवा सिद्धांत या कादंबरीच्या रूपाने लेखक सूचित करू इच्छितो. साहित्य अकादमी पुरस्कृत 'रिंगाण' कादंबरी सजीवांच्या उत्क्रांतीची नवी दिशा मांडणारी साहित्यकृती आहे.

## संदर्भसूची

१. कृष्णात खोत. रिंगाण. 2018. (ISBN: 978-93-82364-65-8)
२. Charles Darwin. On the Origin of Species (प्रजातींचा उगम). 1859.
३. Karl Marx, आणि Friedrich Engels. Manifesto of the Communist Party (कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा). 1848.

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429

Volume 6, Issue 7, June 2026

Impact Factor: 8.2

४. विश्वास पाटील. झाडाझडती.
५. केशव खटिंग. सालोसाल.
६. चंद्रकुमार नलगे. देवाची साक्ष.
७. वसंत पाटील. धरणग्रस्तांच्या कविता.

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

DOI: 10.48175/IJARSCT-37545